बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

## डेबिट कार्ड व्यवहारांची सुरक्षितता वाढविण्यासाठी अधिसूचना

प्रिय ग्राहक,

डेबिट कार्डची सुरक्षितता वाढविण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त झालेल्या सल्ल्यानुसार बँकेच्या डेबिट कार्ड्सच्या बाबतीत खालील बदल करण्यात आलेले आहेत:

- ज्या विद्यमान कार्डांचा उपयोग कधीही ई-कॉमर्स आणि/किंवा संपर्करहित आणि/किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहारांच्या चॅनेल्ससाठी केला गेला नसेल, ती तशा प्रकारच्या संबंधित व्यवहारांसाठी निष्क्रिय करण्यात आलेली आहेत, परंतु ग्राहक त्यांच्या नजीकच्या शाखेत केवळ विनंती करून असे व्यवहार पुन्हा कधीही सक्रिय करू शकतात.
- कार्डवरून करण्यात येणाऱ्या व्यवहारांच्या सुरक्षिततेत सुधारणा करण्यासाठी, आता एटीएम, पीओएस, ई-कॉमर्स आणि संपर्करहित व्यवहारांसाठी चॅनेल चालू/बंद सुविधा सुरू करण्यात आलेली आहे आणि हे पर्याय आता नजीकच्या शाखेत विनंती केल्यास उपलब्ध आहेत.
- आता ग्राहकांना डेबिट कार्डसाठी एटीएम, पीओएस, ई-कॉमर्स आणि संपर्करहित चॅनेल्ससाठी वेगवेगळ्या मर्यादा असू शकतात.
- ०१ ऑक्टोबर २०२० रोजी किंवा नंतर निर्गमित करण्यात आलेली सर्व नवीन कार्ड्स मूलत:च एटीएम आणि पीओएस डोमेस्टिक चॅनेल्ससाठीच सक्रिय असतील. परंतु ग्राहकाकडून विनंती प्राप्त झाल्यानंतर, शाखा असे कार्ड ई-कॉमर्स आणि संपर्करहित चॅनेल्ससाठीही सक्रिय करू शकते.

चॅनेल सक्रिय/निष्क्रिय करण्यासाठी आणि कार्ड मर्यादा सुविधेच्या अपडेशनसाठी ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग सुविधेच्या माध्यमातून लवकरच २४ X७ आधारित सुविधा उपलब्ध केली जाईल.

**महाव्यवस्थापक**
**माहिती तंत्रज्ञान**